# नाशिक महानगरपालिका, नाशिक

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम–९५ अन्वये,
सन २०२३ – २०२४ च्या ‘अ’, ‘क’ आणि ‘प’ अंदाजपत्रकाचे
(सन २०२२–२०२३ च्या सुधारित अंदाजपत्रकासह)

# महापालिका आयुक्तांचे निवेदन

## नाशिक महानगरपालिका, नाशिक
## सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ चे मूळ अंदाजपत्रक
## महापालिका आयुक्तांचे निवेदन

सर्व सन्माननीय नाशिककर बंधू भगिनींनो...

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-९५ अन्वये महानगरपालिकेच्या जमा-खर्चाचे सन २०२२-२३ चे सुधारीत व २०२३-२४ चे मूळ अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. सदर अंदाज तयार करत असतांना, महापालिकेस प्राप्त होणारे विविध कर, शुल्क, फी, अनुदाने व अन्य जमा लक्षात घेऊन मनपा कार्यक्षेत्रात करावयाची विकास कामे व पुरवावयाच्या सेवांसाठी होणाऱ्या खर्चाचा प्राधान्यक्रम ठरवून योग्य ताळमेळ घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सन्माननीय मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे व सन्माननीय मा.उप-मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे नाशिक महानगरपालिका विकासाच्या पथावर असून, चालु आर्थिक वर्षात देखील शासनाच्या स्तरावरून मनपास विविध योजना अंतर्गत भरीव निधी प्राप्त होईल याची मला खात्री आहे.

शहरातील रस्ते, पदपथ, उड्डाणपूल, जलवाहिन्या, मलनि:स्सारण वाहिन्या, परिवहन, विद्युतीकरण, उद्यान विकास, शिक्षण, वैद्यकिय सेवा, घनकचरा व्यवस्थापन इ. नागरी सुविधांची पूर्तता करतांना समतोल विकासाचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन, सुलभ, पारदर्शक व गतिमान प्रशासकीय कामकाज करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच स्मार्ट स्कूल, पर्यावरण, नमामी गोदा, वैद्यकीय सेवा, आय.टी पार्क विकसीत करणे या बाबींवर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे.

### सन २०२२-२३ चे सुधारित अंदाजपत्रक

सन २०२२-२३ च्या मंजूर अर्थसंकल्पानूसार डिसेंबर २०२२ पर्यंतच्या नऊमाही कालावधीत प्रत्यक्ष जमा झालेला महसूल व करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच उर्वरित तीन महिन्यांच्या कालावधीत प्राप्त होणारी जमा आणि विकास कामावरील खर्च गृहित धरुन सन २०२२-२०२३ चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानूसार र.रु. २९४.५३ कोटी आरंभीच्या शिल्लकेसह, र.रु. २३७७.१२ कोटी जमा व र.रु. २३२५.८६ कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन २०२२-२३ च्या सुधारित अंदाजपत्रकानूसार अखेरची शिल्लक रु. ५१.२६ कोटी दर्शविण्यात आलेली आहे.

### सन २०२३-२०२४ चे मूळ अंदाजपत्रक

सन २०२३-२०२४ ह्या वर्षाचे अंदाज तयार करतांना यापुर्वी हाती घेतलेल्या कामांचे दायित्व व जमा होणारा महसुल याचा वास्तववादी विचार करून, जमा खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

#### — उत्पन्नाच्या बाबी —

महापालिकेच्या महसुलामध्ये प्रामुख्याने जीएसटी अनुदान, मालमत्ता कर, नगररचना शुल्क व पाणीपट्टी यांचा समावेश आहे. तसेच मालमत्ता उपयोगिता, विविध सेवा व अन्य साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा समावेश आहे. तसेच पारंपारीक उत्पन्न स्त्रोतांसोबतच मनपास आता नवनवीन कायम स्वरुपी उत्पन्नाचे स्त्रोत तयार करावे लागणार आहे.

**जीएसटी/स्थानिक संस्था कर विभाग :**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार असाधारण क्रमांक ५५ अन्वये वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे जकात व स्थानिक संस्था कर रद्द केल्याने स्थानिक प्राधिकारणांना भरपाई देण्यासाठी अनुदान देणेचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार सद्यस्थितीत दरमहा ९९.०९ कोटी अनुदान (वार्षिक ११८९.०८ कोटी) प्राप्त होत आहे. सन २०२३-२४ करीता त्यामध्ये ८ टक्के वाढ गृहित धरुन र.रु.१२८४ कोटी अनुदान प्राप्त होऊ शकेल.

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ११४९.२३ |
| सन २२-२३ सूधारीत | १२६०.३८ |
| सन २३-२४ प्रस्तावित | १३४४.९० |

उपरोक्त प्रमाणे सन २०२३-२४ मध्ये महानगरपालिकेस जीएसटी अनुदान, स्थानिक संस्था कर वर १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभार असे एकुण अंदाजे र.रु. १३३९.८९ कोटी इतके उत्पन्न प्राप्त होईल.

**मालमत्ता कर विभाग :**

शहरातील कोणतीही मालमत्ता कर आकारणी विना राहू नये, या करीता नाशिक शहरातील मिळकतींचे, GIS Mapping चे काम प्रगती पथावर असून, मिळकत सर्व्हेक्षणात कर निर्धारणावाचुन वंचित असलेल्या अंदाजे २८५०० मिळकतींना मालमत्ता कर लागु केला आहे.
वाढीव बांधकाम व वापरात बदल इ. अंदाजे १,१८,००० मिळकतींना, वाढीव मालमत्ता कर लागू करणे बाबत विशेष नोटीसा बजावणी करणे बाबत कार्यवाही सुरु आहे तसेच मालमत्ता व पाणीपट्टी धारकांना कराचे देयक अदागयी करणेकामी E-mail, WhatsApp, Sms या अत्याधुनिक माध्यमांचा वापर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | १४७.८९ |
| सन २२-२३ सूधारीत | १८५.०६ |
| सन २३-२४ प्रस्तावित | २२७.०७ |
| • मनपा स्व:उत्पन्न व मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बाबींसहीत एकूण उत्पन्न | |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मालमत्ता विभागास र.रु १८५.०० कोटी उद्दीष्ट देण्यात आले होते, त्यापैकी मालमत्ता कराचे दिनांक.२०/०२/२०२३ अखेर र.रु १५२.८९ कोटी व पाणीपट्टीचे ७० कोटी देण्यात आले होते त्यापैकी र.रु.४८.५८ कोटी इतके उद्दिष्ट साध्य करणेत आलेली आहे.

**नगररचना विभाग :**

नाशिक शहराचे ड्रोन सर्वेक्षण करून GIS मध्ये मॅपिंग करणे संपूर्ण नाशिक शहराचे High Resolution Drone Image च्या सहाय्याने एरियल सर्वेक्षण करून GIS मध्ये मॅपिंग करणेचे नियोजन आहे. जेणेकरून शहरातील अस्तित्वातील असलेले सर्व Utilities जसे पाणी / सांडपाणी / विद्युत / गॅस वाहिनी, उद्याने, आरक्षणे, नद्या/नाला, बस/रेल्वे स्थानक, अनधिकृत बांधकामे व इत्यादींची माहिती गोळा करणे, संकलित करणे, विश्लेषण करणे व ते मॅप मध्ये दर्शविल्यामुळे भविष्यामध्ये नाशिक शहराचे नियोजनाच्या दृष्टीने सदर माहिती उपयुक्त ठरेल तसेच नवीन अभियांत्रिकी प्रकल्प हाती घेताना सदर माहितीचा उपयोग होईल.

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ४२५.१३ |
| सन २२-२३ सूधारीत | ३०७.७३ |
| सन २३-२४ प्रस्तावित | २५५.०० |
| • मनपा स्व:उत्पन्न व मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बाबींसहीत एकूण उत्पन्न | |

नगरनियोजन विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या भुखंड विकास परवानग्या, इमारत बांधकाम परवानग्या व भोगवटा दाखला इ. BPMS या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने देण्यात येत आहेत. तसेच मार्च, २०२३ पासून Sofftech या नविन संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन प्रणालीद्वारे भुखंड विकास परवानग्या, इमारत बांधकाम परवानग्या व भोगवटा दाखला इ. विकासकांना देण्यात येणार आहेत. शहरातील नाला सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

**टेक सिटी**

- I.T क्षेत्रामध्ये काम करीत असलेल्या लोकांकरिता रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणे करिता नाशिक शहरांमध्ये नाशिक आय.टी पार्क प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर आय.टी पार्क राज्य शासनाचे IT/ITES धोरणानूसार महापालिकेच्या क्षेत्रामध्ये

प्रस्तावित करण्यात येत असून त्याबाबतचा स्वतंत्र चाचपणी अहवाल तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

**लॉजिस्टिक पार्क**

- नाशिक शहरांमधून भारतमाला परियोजनेचा भाग असलेला सुरत- चेन्नई महामार्ग प्रस्तावित करण्यात आला असून भविष्यामध्ये या महत्त्वाच्या परिसरामधून मोठ्या प्रमाणात अवजड मालवाहतुकीची आवाजावी होणे अपेक्षित आहे त्यामुळे सदर क्षेत्रामध्ये लॉजिस्टिक पार्क होणे गरजेचे असल्याने महानगरपालिकेमार्फत महापालिका क्षेत्रात राज्य शासनाचे Logistic Park धोरणाचे अधिन राहून लॉजिस्टिक पार्क प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ट्रक टर्मिनल**

- नाशिक शहरामध्ये अवजड वाहनांची वाहतूक कोंडी कमी करण्याच्या उद्देशाने ट्रक टर्मिनल प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर ट्रक टर्मिनल विकास योजने मध्ये प्रस्तावित केलेल्या बाह्य वळण रस्त्याच्या जवळ विकसित करण्यात येतील.

**पाणीपट्टी विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ६३.३७ |
| सन २२-२३ सूधारीत | ७०.०० |
| सन २३-२४ प्रस्तावित | ७५.०० |

पाणी पटटी वसुलीसाठी मोबाईल अॅड्राईड अॅप कार्यप्रणाली विकसित करण्यात आली असून सदर अॅप मुळे नागरीकांना स्वत: जलमापकाचे छायाचित्र अपलोड केल्यावर त्वरीत देयके E-mail, WhatsAap, Sms द्वारे उपलब्ध झाल्यामुळे थकबाकीचे प्रमाण कमी होईल.

**जाहिरात व परवाने विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | १६.७३ |
| सन २२-२३ सूधारीत | १८.३३ |
| सन २३-२४ प्रस्तावित | ४५.८४ |

मनपा मालकीचे एकूण ६२ शॉपिंग सेंटर असून त्यामध्ये २०९३ गाळे व ८५१ ओटे आहेत. गाळयांची जागा लायसेन्स फी वसुली माहे. जानेवारी २०२३ अखेर र.रु. ४७१.६० लक्ष झालेली असून थकबाकी वसूली करणेकामी संबंधितांना नोटीसा बजाविणेत आलेल्या आहेत. त्यानुसार संबंधितांनी जागा लायसेन्स फी व इतर सरकारी करांचा भरणा मुदतीत न केल्यास गाळा जप्तीची कारवाई करणेत येणार आहे. तसेच जाहिरात होर्डींगद्वारे र.रु. ८६.३० लक्ष वसुली झाली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या जागा व विद्युत पोल जाहिरातीकरीता उपलब्ध करुन ई-निविदेव्दारे वाटप करण्यात आलेल्या असून, त्यापासुन वार्षिक उत्पन्न २७१.०० लक्ष उत्पन्न प्राप्त होणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ असे संबोधण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे महानगरपालिका अधिनियम, कलम ३८६ (२) नुसार परवाना शुल्कामध्ये दि.०१/०१/२०२३ पासून आदेश क्र. ५५ दि. २९/१२/२०२२ अन्वये वाढ केल्याने,त्यापासुन नाशिक महानगरपालिकेस अतिरिक्त वाढीव उत्पन्न प्राप्त होणार आहे.

**खर्चाच्या बाबी**

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून खर्चाच्या बाबींची प्राथमिकता ठरवितांना आधुनिक सोयी सुविधांयुक्त रस्ते, पाणी पुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, वैदयकीय रुग्णालये, सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, नदी स्वच्छता, परिवहन सेवा, उद्याने, क्रिडांगणे, महिलांसाठी सुविधा, पर्यावरण व गोदावरी संवर्धन इ. बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

**सार्वजनिक आरोग्य विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ७१.४३ |
| सन २२-२३ सूधारीत | ३२.९५ |
| सन २३-२४ प्रस्तावित | ४०.३५ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

- नाशिक महानगरपालिकेमार्फत मनपा कार्यक्षेत्रात ५ रुग्णालये व ३० शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. सदर शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत बाहय रूग्ण तपासणी व उपचार तसेच कुटुंब कल्याण, लसीकरण, किटकजन्य आजार, क्षयरोग, कुष्ठरोग, माता व बालसंगोपन कार्यक्रम, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना इ. आरोग्य विषयक सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राबविले जातात.
- याच बरोबर राज्य शासनाकडून राबविण्यात येणारे जागरूक पालक –सुदृढ बालक या सारखे सर्व आरोग्य विषयक कार्यक्रम मनपा क्षेत्रात राबविण्यात येत आहेत.
- हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रूग्णालय, नाशिकरोड येथे अद्यावत सीटी स्कॅन व एम.आर.आय. स्कॅन मशिन बसवण्यात आलेले असून मे. स्टार इमेजिग प्रा. लि. नवी दिल्ली यांचेमार्फत CGHS (Central Government Health Scheme) च्या दरांनुसार सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सदर चाचण्यांमधुन प्राप्त होणा-या बिलाच्या रकमेतील ५०% रक्कम रॉयल्टी म्हणुन मिळणार आहे तसेच सदर ठिकाणी अद्ययावत मॉल्युक्युलर लॅब सुरु करण्यात आलेली असुन आजपावेतो १.२५ लाखापेक्षा जास्त तपासण्या करण्यात आलेल्या आहेत.
- 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत डॉ. झाकीर हुसैन रुग्णालय, कथडा व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रूग्णालय, नाशिकरोड या दोन दवाखान्यांची नोंदणी करण्यात आलेली असून त्याअंतर्गत रुग्णांवर उपचार देखील करण्यात येत आहे त्यामुळे सदर योजने अंतर्गत नाशिक मनपाला रुग्णांच्या उपचाराकरीता नियमानुसार निधी उपलब्ध होणार आहे.
- नाशिक महानगरपालिका परीक्षेत्रातील रहिवासी असलेले कुष्ठरोगपिडीत लाभार्थी यांना देखील दरमहा रक्कम रुपये - १५००/- इतके अनुदान औषधोपचाराकरीता देण्यात येत आहे.
- नाशिक शहरामधील दिव्यांग बांधवांना तपासणी, दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र तयार करण्याकरिता हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय, नाशिकरोड व डॉ. झाकीर हुसेन रुग्णालय येथे सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**झोपडपट्टी सुधारणा विभाग:**

- **रमाई आवास योजना (अनुसुचित जाती व नवबौध्द धारकांसाठी घरकुल** योजने अंतर्गत मनपा क्षेत्रात आज पावेतो एकुण ६३ लाभार्थ्यांना र.रु. ९७.७० लक्ष अनुदान वितरित करण्यात आले आहे.
- **तसेच जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुथ्थान अभियांनातर्गत शहरी गरींबाकरीता** मुलभुत सुविधा पुरविणेकामी पात्र झोपडपट् धारकांना शासनामार्फत बांधण्यात येणाऱ्या इमारतीतील २६९ स्क्वेअर फुटाची सदनिका देणे बाबत आदेशीत असून **आज पावेतो ७,२५२** इतकी सदनिका वितरीत करण्यात आलेले आहे व उर्वरित **२०८** सदनिकांची सोडत प्रक्रिया प्रस्तावित आहे.
- **प्रधानमंत्री आवास योजना केंद्र शासनाने सर्वांसाठी घरे २०२२ चा संकल्पनेवर** सदर योजना जाहीर केली असून महानगरपालिका कार्यक्षेत्रात योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून त्याअंतर्गत घटक क्र. ०४ आर्थिक दूष्टया दुर्बल (EWS) घटकातील लाभार्थ्याद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान. (Beneficiary- led individual house construction or enhancement - BLC) अंतर्गत एकूण ९१ लाभार्थी मंजुर करण्यात आले

आहे, त्यापैकी ७३ लाभार्थ्यांना घरकुल बांधणेकामी अनुदान वाटप झालेले आहे, आता पावेतो ५० घरकुलांचे बांधकाम पुर्ण झालेले आहे आणि १८ लाभार्थ्यांना बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

**सार्वजनिक बांधकाम विभाग :**

- **मुख्य रस्ते/अंतर्गत रस्ते विकसित करणे :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ३२६.२५ |
| सन २२-२३ सूधारीत | ४१०.५५ |
| सन २३-२४ प्रस्तावित | ४०४.४६ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

- महापालिका क्षेत्रातील रस्त्यांचे अस्तरिकरण करणे, खडीच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे व नव्याने विकसित झालेल्या वसाहतींमध्ये खडीचे रस्ते तयार करण्याचे नियोजन आहे. मुख्यत्व: म्हणजे मनपा हद्दीतील गुजरात राज्यास जोडणारा महत्वाचा रस्ता पेठ रोडसाठी परीसरातून जाणारा रस्त्यासाठी विशेष तरतुद करण्यात आली असून साधारण ३० मीटर रुंदीचा रस्ता विकासीत करण्याचे प्रस्तावित आहे.

  तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळयासाठी नियोजन आणि आवश्यक कामे यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करणे, शासनाकडे निधीसाठी प्रकल्प अहवाल सादर करणे यासाठी नियोजन सुरुवात करण्यात येणार आहे.
- नाशिक शहरातील बाहय रिंगरोड, मध्य रिंगरोड, अंतर्गत रिंगरोड तसेच सर्व महत्वाचे रस्ते पुर्ण रुंदीला विकसित करण्याच्या दृष्टीने मिसिंग लिंक शोधून रस्त्यांच्या अशा जागा T.D.R व F.S.I च्या माध्यमातून ताब्यात घेणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे.
- नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी सार्वजनिक वाहतूकीच्या दृष्टीकोनातून निओमेट्रो प्रकल्प तात्काळ सुरु होणेकामी शासनाकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
- शहरातील विविध चौकातील रहदारी नियोजन व उपाययोजना यासाठी विविध अभियांत्रिकी महाविद्यालये व N.G.O यांच्या माध्यमातून वाहतूक गणना (Traffic Count) करण्यात येणार असून कायमस्वरूपी उपाययोजना करणेकामी शासनाकडून निधी उपलबध करणेकामी प्रयत्न करण्यात येणार आहे. शहरातील रस्त्यांवर होणारे अपघात टाळण्यासाठी ब्लॅक स्पॉटच्या ठिकाणी तज्ञ सल्लागारांचे सल्ल्यानूसार विविध उपाययोजना हाती घेण्यात येत आहे.
- महानगरपालिका परीक्षेत्रातील विविध ठिकाणे, दुभाजक, चौक, खुल्या जागा इ. खाजगी सहभागातून व्यावसायिक सामाजिक जबाबदाऱ्या माध्यमातून सुशोभिकरण करण्याचे योजिले आहे तसेच उत्पन्न वाढीच्या दृष्टीने रस्ते दुभाजक, खुल्या जागा इ. ठिकाणी मोबाईल टॉवर उभारून त्याव्दारे भाडेपट्टयाने कायमस्वरूपी उत्पन्नाचा स्त्रोत निर्मिती होणेकामी प्रयत्न सुरु आहे.
- पांडवलेणी येथिल दादासाहेब फाळके स्मारकाचे रामोजी फिल्मसिटीच्या धर्तीवर नियोजन व विकसन करणेच्या दृष्टीने अनुभवी सल्लागार यांच्याकडून ऑफर मागविण्यात येणार असून विकसनासाठी शासनाच्या पर्यटन विभागाकडून निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न सुरु आहे तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम पेठरोड परीसरात करणेकामी पुढील टप्प्याच्या विकसनासाठी तरतूद करण्यात आली आहे.

- शहातील पार्कींग समस्येवर मात करण्यासाठी यशवंत मंडई येथे पार्कींग प्लाझा विकासित करणेसाठी पुनश्च: E.O.I प्रसिध्द करणेत येत आहे तसेच शहरात काही ठिकाणी मल्टीलेवल पार्कींग विकसित करणेचे देखील प्रस्तावित आहे.
- टिकरींग लॅबच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील शाळा, कॉलेज मधील सुमारे २० लाख विद्यार्थांना मार्गदर्शन करणेत येते. सदर लॅब अतर्गत मायक्रो कोर्सेस, विविध समुदायांसाठी नवीन्य प्रकल्प राबविणेत येणार आहेत.
- सायन्स सेंटर हे टिकरींग लॅब माध्यमातून उभारणेत येणार असून शाळा कॉलेजांसाठी कॉमन फॅसिलिटी सेंटर उभारणेत येणार आहे. शासनाच्या सन 2020 नवीन शिक्षण धोरणानुसार सदर सायन्स सेंटर उपयोगी पडणार असून शाळा, कॉलजांना रिसर्च करणे कामी उपयोग होणार आहे. सदर ठिकाणी वर्षातून कमीत कमी 100 कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे.
- फाळके स्मारक- नाशिक मनपाच्या मौजे पाथर्डी येथील स.नं.287 या जागेवर चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारकच्या जागेत रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर विविध सुविधा पुरविणे, थिम पार्क, वॉटर पार्क मधील नवीन उपकरणे बसविणे, अँम्युझमेंट पार्क, अॅडव्हेंचर पार्क, फिल्म सिटी तयार करणेत येणार आहे.

**अतिक्रमण विभाग:**

नाशिक महानगरपालिका खाजगी जागेवरील अनधिकृत बांधकामे काढणेसाठी नियमबाहय बांधकामांची प्रत्यक्ष पाहणी करुन अंतीम नोटीस दिल्यावर अनधिकृत बांधकामांची कार्यवाही केली जाते. सार्वजनिक रस्ते व खुल्या जागांवरील अतिक्रमण कारवाई अंतर्गत हातगाडया, टपऱ्या, स्टॉल, होर्डींग व बॅनर इ. साहीत्य जप्त करण्यात येते तसेच जप्त केलेले साहीत्य सोडविण्यासाठी दंड वसुल करण्यात येतो. त्याचप्रमाणे मनपाच्या जागा, शासकीय जागा यावर नव्याने अतिक्रमणे होऊन झोपडपट्ट्या तयार होऊ नयेत व अनाधिकृत बांधकामे होऊ नयेत या प्रकरांवर आळा घालण्यासाठी मनपाची दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समिती मार्फत आप आपल्या विभागीय कार्यालय हद्दीमध्ये दैनंदीन पाहणी करुन अनाधिकृत बांधकामास प्रतिबंध करण्यात येतो.

तसेच अनधिकृत होर्डींग लावणाऱ्यांविरुध्द अतिक्रमण विभागामार्फत संबंधीत पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात येत असतात. त्याचप्रमाणे अनधिकृत धार्मिक स्थळांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. १०४/२०१० मध्ये मा. न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांनूसार महानगरपालिका स्तरीय समिती स्थापन करण्यात येऊन मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार अनधिकृत धार्मिक स्थळे हटविण्याची कारवाई करण्यात येत आहे.

**राष्ट्रीय फेरीवाला धोरण:**

राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ आणि पथविक्रेते (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम - २०१४ नुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील १०६१४ फेरीवालांची बायोमेट्रिक पध्दतीने नोंदणी करणेत आलेली आहे. या नोंदणीकृत फेरीवाल्यांना नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र देणेची कार्यवाही सुरु आहे. फेरीवाल्यांकडुन दैनंदिन जागा लायसन्स फी वसुलीसाठी ऑनलाईन पध्दती अवलंबविण्यात येणार आहे. फेरीवाल्यांना जागा नेमुन देण्यासाठी महापालिकेच्या

सहाही विभागात फेरीवाला क्षेत्र निर्माण करणेत आले आहे. फेरीवाला क्षेत्र निश्चित झाल्यानंतर फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना जागा निश्चित करुन देण्यासाठी आखणी करावी लागणार आहे. तसेच फेरीवाला क्षेत्रात पाणी, स्वच्छतागृह, विदयुत, जागेचे सपाटीकरण, ओटे इ.सोयी सुविधा कराव्या लागणार आहेत.

**पाणी पुरवठा व्यवस्थापन व यांत्रीकी विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ७०.४३ |
| सन २२-२३ सूधारीत | १०४.४७ |
| सन २३-२४ प्रस्तावित | ९२.१९ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

नाशिक शहरासाठी सुमारे गरजेपैकी ७५% पाणी गंगापुर धरणातुन व २५% पाणी मुकणे धरणातुन उचलण्यात येते. जलशुध्दीकरण केंद्राची सुधारणा करणे तसेच वितरण व्यवस्थेतील सुधारणा करण्यासाठी र.रु.३५० कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करुन राज्य शासनास अमृत योजने अंतर्गत सादर करण्यात आला आहे.

सिंहस्थाचा विचार करता व शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता सद्य:स्थितीतील गंगापूर धरण येथून असलेली मुख्य रॉ वॉटर पाईप लाईन पी.एस.सी ( सिमेंटची) असून तिची क्षमता कमी कमी होत आहे व तसेच पाणी गळती वाढत असल्याने नवीन पाईप् लाईन टाकणेची गरज आहे त्यामुळे १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचे अनुदानातून गंगापूर धरण ते बारा बंगला जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत १८०० मीमी व्यासाची लोखंडी साहित्याची मुख्य गुरुत्ववाहिनी टाकणेचा र.रु.२२० कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता घेऊन सदरचे काम हाती घेण्यात येत आहे. सदर योजनेचे काम सन २०२३ - २०२४ ते सन २०२५ - २०२६ या वर्षात करण्याचे नियोजन आहे.

**मलनि:स्सारण व्यवस्थापन व यांत्रीकी विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ८२.४४ |
| सन २२-२३ सूधारीत | ७१.२० |
| सन २३-२४ प्रस्तावित | ७०.७२ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

- **मलवाहिका टाकणे**

  नाशिक महानगरपालिका क्षेत्रात एकूण ६ विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये सन २०२२-२०२३ मध्ये एकूण ४९.०० कि.मी. लाबींच्या मलवाहिका टाकण्यात आलेल्या आहेत. सद्य स्थितीत नाशिक महानगरपालिका क्षेत्रात एकूण मलवाहिकांची लांबी सुमारे १९६८.०० कि.मी.आहे.

- **अमृत योजना नाशिक सिवरेज २ :**

  अमृत १.० योजनेअंतर्गत गंगापुर येथे १८ द.ल.लि. क्षमतेचा मलजलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करुन माहे डिसेंबर २०२० मध्ये व पिंपळगांव खांब येथे ३२ द.ल.लि. क्षमतेचा मलजल शुध्दीकरण केंद्राची उभारणी करुन माहे मार्च २०२२ मध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे.

- **मलनि:सारण केंद्रांची सुधारणा व आधुनिकीकरण करणे :**

भारत सरकारच्या जेएनएनयुआरएम (JNNURM) या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत बायोगॅस इंजिन बसविण्यात आले आहे. सदरची वीज ही मलनि:सारण केंद्रासाठी वापरात घेतली जात आहे. १००% प्युअर गॅसवर चालणारे कॅटरपीलर कंपनीचे बायोगॅस इंजिन ८५ केडब्ल्युईचे दोन नग सन २०१२-१३ मध्ये बसवून वीजनिर्मिती सुरु झाली आहे.

तपोवन येथे ७८ दललि/दिन आणि ५२ दललि/दिन क्षमतेचे दोन मलजलनि:सारण केंद्र कार्यान्वित आहे. सदरचे केंद्रात तयार होणाऱ्या मिथेन गॅसचे प्रथमत: प्युरि फिकेशन करुन नंतर

बायोगॅस इंजिनला पुरवठा होतो. त्यानुसार साधारण पणे दैनंदिन ८ ते १० तासापर्यन्त गॅस उपलब्धतेनुसार इंजिन चालवून पूर्ण लोड घेऊन वीजनिर्मिती / वापर सुरु आहे.

महावितरण कंपनीकडून सन २०२१-२०२२ वर्षाकरीता पॉवर फॅक्टर इन्सेन्टिव्ह पोटी वीज बिलात र.रु.१६,९३,८११/- इतकी बचत करण्यात आली आहे. तसेच र.रु. ७७,३०,९८९/- प्रॉम्पट पेमेंट डिस्काऊंट प्राप्त झाला आहे.

## विद्युत व्यवस्था विभाग :

नाशिक मनपा मार्फत इलेक्ट्रिक व्हेईकल करिता चार्जिंग स्टेशन उभारणे बाबत नाशिक मनपाचे नियोजन आहे. त्या करिता NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत र. रू. १० कोटी प्राप्त निधीतून प्रथमत: प्रायोगिक तत्वावर २० ठिकाणी इलेक्ट्रिक व्हेईकल करिता चार्जिंग स्टेशन उभारणे प्रस्तावित केले असून महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिक व्हेईकल पॉलिसी २०२१' अनुसार इलेक्ट्रिक व्हेईकल (EV) वापरणे बाबत धोरण जाहीर केलेले आहे.

त्यानुसार मा.राज्य शासनाकडून इलेक्ट्रिक वाहनाच्या वापरास प्रोत्साहन देणेसाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, ठाणे, नागपूर आणि नाशिक या सहा शहरात सार्वजनिक वाहतुकीमध्ये इलेक्ट्रिक व्हेईकलचा वापर प्रथम करणेबाबत नमूद केले आहे त्यानूसार माझी वसुंधरा अभियान अंतर्गत मनपाने व्हेईकल चार्जरस खरेदी करून चार्जिंग स्टेशन उभारून चालवावेत याबाबत शासन निर्देश प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ६३.६९ |
| सन २२-२३ सूधारीत | ६८.४० |
| सन २३-२४ प्रस्तावित | ८३.१० |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

## कार्यशाळा व्यवस्थापन विभाग :

नाशिक महानगर पालिकेच्या पदाधिकारी व अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी यापुढे वाहने खरेदी करावयाची झाल्यास बॅटरीव्दारे संचालित इलेक्ट्रीक वाहने, सीएनजी इंधनावर चालणारी वाहने खरेदी करणेस मा.महासभेने मंजुरी दिलेली आहे. त्यानूसार यापुढे पर्यावरणपुरक वाहने खरेदी करणेत येतील.

इलेक्ट्रीक व्हेईकल चार्जीग स्टेशनसाठी एकंदरीत १०६ ठिकाणी सर्व्हे करण्यात आला आहे. बीओटी तत्वावर निविदा काढून ई. व्ही. चार्जीग स्टेशन सुरु करण्यात येणार आहे. प्रथमत: मनपा कार्यालयामध्ये प्रयोगिक तत्वावर सुरु करणार असून इतर कार्यालयामध्ये इलेक्ट्रीक व्हेईकल चार्जीग स्टेशन सुरु करण्याचा मानस आहे.

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ८.२३ |
| सन २२-२३ सूधारीत | ७.७९ |
| सन २३-२४ प्रस्तावित | ११.४० |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

## परिवहन सेवा :

- नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सक्षम व शाश्वत शहर बससेवा ८ जुलै २०२१ रोजी पासून सुरु केली आहे. CITILINC तर्फे २०० CNG व ५० Diesel बसेस GCC तत्वावर चालवण्यात येत आहेत. त्यापैकी सुमारे १५० बस द्वारे ५३ मार्गांवर CITILINC ची सेवा कार्यरत आहे. तिकिटात काही सवलती देण्यात येतात त्यात १० वर्षाखालील वयाच्या मुलांना ५०%, दिव्यांग लोकांना मोफत व विद्यार्थ्यांनासाठी ५०% इतकी सवलत दिली जाते. नाशिक शहर बस सेवेला केंद्र शासनाचा Excellence in Urban Transport पुरस्कार मिळाला आहे.

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ५९.९६ |
| सन २२-२३ सूधारीत | १००.०० |
| सन २३-२४ प्रस्तावित | ५८.०० |
| *भांडवली व महसुली खर्च | |

- लोकांना बस सेवेची माहिती मोबाइल वर उपलब्ध व्हावी म्हणून नाशिक सिटी बस या नावाने मोबाइल अँप बनवले आहे. याद्वारे प्रवाशांना बसचे स्थान, मार्गांची माहिती, ऑनलाईन तिकीट बुक करण्याची सुविधा तसेच जवळचे बस थांबे यांची माहिती मिळते.
- मा. महाराष्ट्र शासनाच्या नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम (NCAP) अंतर्गत मनपाच्या शहर बससेवेसाठी सन २०२३-२४ मध्ये २५ ई-बसेस व सन २०२४-२५ मध्ये २५ ई-बसेस अशा एकुण ५० इलेक्ट्रीक बसेस जी.सी.सी. तत्वावर घेण्याचे प्रस्तावीत आहे. तसेच इलेक्ट्रीक बसेससाठी आडगांव ट्रक टर्मिनल येथे स्वतंत्र बसडेपो प्रस्तावित आहे.

## माहिती व तंत्रज्ञान विभाग :

| | |
|---|---|
| सन २०-२१ प्रत्यक्ष | ३.४० |
| सन २१-२२ सूधारीत | ३.९० |
| सन २२-२३ प्रस्तावित | ४.१९ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

मा.शासनाच्या ई-प्रशासन धोरणांतर्गत पेपरलेस संकल्पनेची अंमलबजावणी करणेकामी नाशिक महानगरपालिकेतील विविध विभागांचे संगणकीकरण करणे, ई- ऑफिस प्रणालीचा प्रभावी व काटेकोर वापर करणे, ई. आर. पी. कार्यप्रणालीचे रिप्लॅटफॉर्मेशन व अपग्रेडेशन करणे. नाशिक महानगरपालिका समाजकल्याण विभागामार्फत दिव्यांग बांधवांना देण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजना तसेच नाशिक महानगरपालिका हद्दीतील निराधार / विधवा / घटस्फोटीत महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांचे संगणकीकरण करणे इ. कामे प्रस्तावित आहेत.

गोदावरी नदी किनारी स्वच्छते बाबत बाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणे तसेच नदी परिसरात असणारे प्राचीन एतिहासिक धार्मिक व पर्यटन स्थळाची सविस्तर् माहिती ऑनलाईन साईटवर उपलब्ध् करुन देणेकामी कार्यप्रणाली विकसीत करण्यात येत असून कचरा संकलन, स्वयंसेवक, गोदावरी सुशोभिकरण, कार्यक्रमाची/उत्सावांची परवानगी, विधी, मंदिर, प्रदुषण, गंगास्थान, पुर परिस्थिती, गोदावरी पर्यटन, गणपती विसर्जन, बोट क्लब्, कुंभमेळा, महाआरती इ. माहिती नागरिकांना होणेकामी कार्यप्रणाली विकसीत करण्यात येणार आहे.

## घनकचरा व्यवस्थापन विभाग (प्रक्रिया):

स्वच्छ भारत अभियांना अंतर्गत नाशिक महापालिकेच्या हद्दीत तयार होणाऱ्या कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी १५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा प्रकल्प पीपीपी तत्वावर उभारण्यात येत आहे. त्यामुळे शहरातील बांधकाम व पाडकामातून तयार होणाऱ्या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया होणार आहे.

## पर्यावरण व गोदावरी संवर्धन विभाग :

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ११.३८ |
| सन २२-२३ सूधारीत | ०.५३ |
| सन २३-२४ प्रस्तावित | २८.६३ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून) | |

पर्यावरण संवर्धनासाठी वायू प्रदूषण, जल प्रदूषण, मृदा प्रदूषण कमी करणे, तसेच पर्यावरणातील नैसर्गिक साखळी सुदृढ ठेवणे आवश्यक आहे. शहरातील वायू प्रदूषण व नद्यांचे प्रदूषण टाळण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत प्राप्त रक्कमेतून २०% कामे व इतर विविध स्तोत्रातून ८०% कामे करण्याचे उद्दिष्ट असून सदर उद्दिष्ट गाठण्यासाठी रस्त्याच्या कडेच्या हरित पट्ट्याचा विकास, हरित भिंती , दुभाजक व वाहतूक बेट हरितीकरण करून शहरातील वायू प्रदूषण कमी करणे व जास्तीत जास्त सौर ऊर्जेस चालना देऊन शाश्वत ऊर्जा विकास निर्माण करण्यासाठी पर्यावरण विभाग कार्य करीत आहे.

जल प्रदूषण प्रामुख्याने मलजल, औद्योगिक जल यामुळे होते, ते थांबविण्यासाठी “नमामि गोदा” तसेच महाराष्ट्र शासनाच्या “चला जाणूया नदीला” या कार्यक्रमा अंतर्गत शहरातील गोदावरी नदी, तिच्या उपनद्या व ओढे स्वच्छ राहण्यासाठी शहरातील सांडपाण्याच्या स्वतंत्र वाहिन्या निर्माण

करणे व त्यात कचरा, निर्माल्य व इतर प्रदूषणकारी घटक टाकणे परावृत्त करण्यासाठी जनजागृती निर्माण करणे हा प्रमुख उद्देश आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळा विचारात घेऊन गोदावरी नदीचे प्रदुषण रोखणे, पाणी शुध्द ठेवणे तसेच विविध सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने तज्ञ सल्लागाराची नेमणुक करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम "नमामी गोदा" प्रकल्प अंतर्गत हाती घेण्यात आले आहे. प्रकल्प अहवाल तयार करून केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी व निधी मिळणेसाठी सादर करण्यात येणार आहे.

**समाजकल्याण विभाग :**

शासन मार्गदर्शक सुचनांनुसार महापालिका क्षेत्रातील अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती या दुर्बल घटकांकरीता विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ५ टक्के निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर निधीतुन मागासवर्गीय वस्त्यांमध्ये सार्वजनिक रस्त्याची कामे पथदीप, पाणीपुरवठा, मल:निस्सारण व्यवस्था, उद्यान विकासासाठी कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात येत तसेच ५ % निधीतुन १.घटस्फोटीत /विधवा/परित्यक्त्या महिला यांचे मुलींच्या विवाह करीता अर्थसहाय्य योजना २.विधवा/घटस्फोटीत महिलांची मुले निराधार मुले यांच्यासाठी शिष्यवृत्ती योजना ३.अनाथ/निराश्रीत मुलांना दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनपर अनुदान योजना ४.अनाथ/ निराश्रीत मुलांकरीता वार्षिक शैक्षणिक शुल्क अर्थसहाय्य योजना सुरु करण्यात आल्या आहेत.

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध दुर्बल घटकांना उचित सेवा-सुविधा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी ५ टक्के, महिला/ बाल कल्याणासाठी ५ टक्के, दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के व क्रीडा धोरणासाठी ५ टक्के असा एकूण २० टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये गुढी पाडव्याचे अनन्य साधारण महत्व लक्षात घेता नव-वर्ष स्वागत समारंभ आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शिक्षण विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | ३.५७ |
| सन २२-२३ सूधारीत | १०.५७ |
| सन २३-२४ प्रस्तावित | १२.५१ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळुन) | |

महानगरपालिकेच्या शाळांना भौतिक पायाभूत सुविधा म्हणजेच वर्ग खोल्या, पिण्याच्या पाण्याची सोय, विद्युत सुविधा, मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर आहे. सदयास्थितीत महानगरपालिकेच्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक ७३, हिंदी माध्यमाच्या -०४, उर्दू माध्यमाच्या -११ अशा एकूण ८८ प्राथमिक शाळा तसेच मराठी माध्यमिक विद्यालय-१०, उर्दु माध्यमिक-२ असे एकूण १२ विद्यालये आहेत. प्राथमिक शाळेत १२७७७ मुले व १३३११ मुली शिक्षण घेत आहे. तसेच माध्यमिक मध्ये १७१४ मुले व १८०९ मुली शिक्षण घेत आहेत. प्राथमिक व माध्यमिक मध्ये एकूण – २९६११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

<u>**स्मार्ट स्कूल प्रकल्प**</u> –

- मनपाच्या ६९ शाळांमध्ये ६५६ स्मार्ट क्लासरुम, ६९ संगणककक्ष, सी.सी.टी.व्ही. कॅमेरा प्रणाली, फर्निचर, नाशिक स्मार्ट सिटी मिशन मार्फत विकसित करणेत येत आहे. तसेच डिमार्ट फांऊडेशन (CSR) फंडातून मनपाच्या पाच (५) शाळांमध्ये संगणक कक्ष व वाचनालय विकसित केले आहे यामध्ये पाच शाळांमध्ये १०५ संगणक संच, ५००० पुस्तके

वाचनालयाकरीता व अध्यावत फर्निचर, बालापेटींग रंगकाम, संगणकाचे ज्ञान असलेले १७ शिक्षक पुरविणेत आलेले आहेत.

- मनपाच्या ९ शाळांमध्ये सक्सेस ग्लोबल फाऊंडेशन व रोटरी क्लब यांच्या मार्फत मियावॉकी फॉरेस्ट तंत्रज्ञानाचा उपयोग करुन २२०० झाडांची लागवड करणेत येत आहे.
- मनपाच्या २२ शाळांमध्ये युवा अनस्टॉपेबल फाऊंडेशन मार्फत २२ स्मार्ट क्लासरुम विकसित करणे येत आहे.
- अॅक्शन ऐड संस्थे मार्फत मनपाच्या १० शाळांमध्ये १० òSTEM Kits तसेच मनपाच्या १० माध्यमिक शाळांमध्ये ५० संगणक संच पुरविणेत आलेले आहेत.

शालेय कामकाज डिजीटल स्वरूपात ठेवणे इ. शैक्षणिक सुविधा देऊन मनपाच्या प्रत्येक विभागातील एक शाळा स्मार्ट करण्याचे नियोजन आहे.

**सार्वजनिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन व यांत्रिकी:**

- महानगरपालिका क्षेत्रात संपुर्ण राज्यात अभिनव असलेला घंटागाडी प्रकल्प राबविण्यात येऊन महानगरपालिकेचे अंदाजे ४०४ घंटागाडी वाहनांद्वारे ३१ प्रभागातील घरातून व रस्त्यांच्या कडेचा केरकचरा दररोज संकलित करून खत प्रकल्पावर रवाना करणेत येतो.
- नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नाशिक पुर्व, नाशिक पश्चिम व गोदाघाट परिसर येथील सार्वजनिक ठिकाणांची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता हि बाहययंत्रणेद्वारा ठेकेदाराने त्याच्या आस्थापनेवर नियुक्ती केलेल्या ७०० कंत्राटी मनुष्यबळाद्वारे करण्यात येते.
- मोफत अंत्यसंस्कार योजने अंतर्गत मृतदेहांचे दहन अंत्यसंस्कार, दफनविधी अंत्यसंस्कार (लिंगायत, गोसावी, नाथपंथी व गवळी समाज) (मुस्लिम धर्मिय) व (ख्रिश्चन धर्मिय) इ.दफनविधी अंत्यसंस्कारासाठी साहित्य व सेवा मोफत पुरविणेत येते.
- सद्यस्थितीत डिझेल शवदाहिनीचा वापर मृतदेहांचे अंत्यसंस्कारासाठी सुरू आहे. नाशिक पुर्व अमरधाम येथे विद्युत दाहिनी सुरू करणेत आलेली आहे.

**पशुवैद्यकीय सेवा विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | १.९६ |
| सन २२-२३ सूधारीत | १.८३ |
| सन २३-२४ प्रस्तावित | ३.१८ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

शासनाच्या मार्गदर्शकसुचनानुसार महानगरपालिका हददीतील मोकाट व भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रीया व अँटीरेबिज लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सार्वजनिक रस्त्यावर फिरणारे मोकाट व जनावरे यांचा उपद्रव कमी करणे कामी कोंडवाडा व्यवस्थापन अंतर्गत यंत्रणा तयार करणेत आलेली आहे. अनधिकृत मांस विक्री करणा-या व्यावसायींकावर दंडात्मक कारवाई करणेत येते. श्वान निर्बिजीकरण करणे, कोंडवाडा व्यवस्थापन करणे, मृत जनावरे उचलने व्यवस्थापन या करीता अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात रक्कम रु. १ कोटी ४५ लक्ष इ. तरतुद करण्यात येत आहे.

**उद्यान विभाग :**

| | |
|---|---|
| सन २१-२२ प्रत्यक्ष | १७.४२ |
| सन २२-२३ सूधारीत | २०.८१ |
| सन २३-२४ प्रस्तावित | २६.३२ |
| *भांडवली व महसुली खर्च (आस्थापना खर्च वगळुन) | |

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सहाही विभागातील ४४१ उद्याने (विकसित व अविकसित) ३ वर्षे मुदतीकरीता दैनंदिन देखभाल करणे कामी लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असुन कामाची लवकरच निविदा मागवुन कामास प्रत्यक्षात सुरुवात करण्याचे नियोजन करणेत आलेले आहे. उद्यानाचे देखभालीचे काम दिलेनंतर उद्याने ही सुस्थितीत राहुन

नागरीकांना उद्यानाचा आनंद घेता येईल. तसेच मनपा क्षेत्रातील ३७ जॉगींग ट्रॅकची दैनंदिन देखभाल करणे कामी लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असुन कामाची लवकरच निविदा मागवुन प्रत्यक्षात काम सुरु करण्याचे दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. दैनंदिन देखभालीचे कामामुळे जॉगींग ट्रॅकवर येणाऱ्या नागरीकांना सुविधा प्राप्त घेऊन अडचणी राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे. **उद्याने नुतनीकरण व सुशोभिकरण – मनपाच्या सहाही विभागातील** अस्तित्वातील उद्यानाचे ठिकाणी आवश्यक दुरुस्तीसह रंगरंगोटी करणे, हिरवळ लावणे सुशोभिकरण करणेची कामे आवश्यकतेनुसार हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यानात विविध विकासकामे हाती घेणेत आली असून ती लवकरच पुर्ण करण्यात येत आहेत.

नाशिक मनपाचे महसुलात वाढ होण्याचे दृष्टीने नाशिक शहरातील महत्वाची उद्यानाच्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक्स खेळणी लावणेसाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. तसेच महत्वाच्या मोठया उद्यानाचे ठिकाणी नागरीकांसाठी प्रवेशशुल्क आकारण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे मनपास उत्पन्न मिळुन नागरीकांना उद्यानाचे ठिकाणी अधिकाअधिक सुविधा पुरविण्याचे दृष्टीने कामकाज करण्यात येत आहे.

**वृक्ष निधी:** सहाही विभागात ७००० वृक्ष लागवड करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. वृक्ष लागवडीमुळे शहरातील हरीत क्षेत्रात वाढ होण्यास मदत होईल. तसेच मागील दोन वर्षापासुन पुष्पोत्सवात कोरोनामुळे खंड पडलेला होता. या वर्षापासुन पुनश्च पुष्पोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असुन यामुळे शहरातील नागरीकांना फुले, फळे व वृक्ष याबाबत अधिक माहिती घेऊन नागरीकांमध्ये जनजागृती होईल.

**'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान'** [DAY-NULM]

मा.केंद्र शासन पुरस्कृत 'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान' (Deendayal Antyodaya Yojana- National Urban Livelihoods Mission [DAY-NULM] योजना शासन निर्णय क्रमांक एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि/-३३, दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ अन्वये नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात अंमलबजावणी करणेस सुरुवात करण्यात आली आहे.

सदर अभियानांतर्गत एकुण १६७० बचतगट स्थापित करण्यात आलेले असून सदर बचतगटांचे एकुण ७३ वस्तीस्तर संघ व २ शहरस्तरसंघ धर्मादाय आयुक्त कार्यालय अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आलेले आहेत. बचतगट सदस्य व अभियानातील इतर सदस्य यांनी तयार केलेल्या सेवा व सुविधा यांना बाजारपेठ मिळवून देणेकामी शहर उपजिविका केंद्र नाशिक रोड येथे कार्यान्वित करण्यात आलेले आहे. बचत गटांतून उत्पादीत वस्तूंच्या विक्रीसाठी हक्काचा बाजार उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

शहरी बेघर निवारा या घटकांतर्गत शासन सर्वेक्षण नुसार आढळलेल्या एकुण ८९४ बेघर नागरिकांसाठी निवारे उपलब्ध करणेकामी १८० बेघर क्षमतेचे एक कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तपोवन, पंचवटी येथे कार्यान्वित आलेले आहे व उर्वरित बेघर व्यक्तींसाठी १०४९ क्षमतेचे मनपाचे

मालकीचे चार जागांवरील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनास मंजुरीसाठी पाठविणेत आलेले आहे. अशाप्रकारे महानगरपालिकेने सर्वेक्षणामध्ये आढळलेले बेघर संख्या त्यानुसार तेवढ्या क्षमतेचे निवारे उपलब्ध करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिलेली नाशिक महानगरपालिका ही राज्यातील एकमेव महानगरपालिका आहे.

## 'प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी' (PM SVANidhi)

मा.केंद्र शासन पुरस्कृत शासन निर्णय क्रमांक-पीएमस्वनिधी-२०२० /प्र.क्र.७७/नवि-२० दिनांक.१७/०६/२०२० राज्यामध्ये "'प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी' (PM SVANidhi) अंमलबजावणी करणेत येत आहे. सदर योजनेंतर्गत पथविक्रेत्यांना मनपाचे शिफारस पत्र (LoR-Letter of Recommendation) देण्यात **नाशिक मनपा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे.** [४५४५५ LoR Issued] .पथविक्रेत्यांना जास्तीत जास्त कर्ज वितरणात करण्यात **नाशिक मनपा महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे.** [20962 Loan Disbursed].नाशिक महानगरपालिकेने समृध्दी योजनेत १४०४८ (९२ %) पथविक्रेत्यांची सोशल इकोनॉमी प्रोफाईलिंग भरून **महाराष्ट्रात अव्वल स्थान मिळविले आहे.** स्वनिधी से समृद्धी' योजनेंतर्गत एकूण ५६७१२ (९३%) लाभार्थ्यांना आठ योजनांचा लाभ देण्यामध्ये नाशिक महानगरपालिका **राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे.**

पुढील आर्थिक वर्षामध्ये या योजनेंतर्गत १० हजार कर्जाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना २० हजार व ५० हजार रुपये कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.तसेच सदर लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांसोबत संलग्न करण्यात येईल.

### अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभाग :

नाशिक महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षावर दरवर्षी पावसाळयामध्ये मोठी जबाबदारी असते. वेगवेगळया आपत्ती उदा. पुर, भुकंप, घर पडणे, झाडे पडणे, रासायनिक दुर्घटना इ. प्रसंगी प्रथमत: प्राथमिक सहायता करणेसाठी आपत्कालीन व्यवस्थापन विभाग सुसज्ज करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शासनाच्या आपत्कालीन विभाग तसेच एन.डी.एम.ए. कडून येणा-या निर्देशानुसार आपत्कालीन व्यवस्थापन चालविले जाते.

- अग्निशमन विभागाकडे सद्यस्थितीत ६ अग्निशमन केंद्रे असुन, प्रत्येक विभागामध्ये एक याप्रमाणे प्रस्थापीत केलेले आहे.
- अग्निशमन दलाकडे वॉटर टेंडर, फायर टेंडर, मेगा बाऊजर, फ्लड रेस्क्यु व्हॅन, हॅजमॅट व्हॅन, हैड्रोलीक प्लॅटफार्म (३२ मीटर), बी.ए.सेट व्हॅन, अतिशिग्र प्रतिसाद व्हॅन (क्यु.आर.व्ही.) उपलब्ध आहेत.
- नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये यापुर्वी ७० मीटर पेक्षा कमी उंचीच्या इमारतींना नगरनियोजन विभागाकडून बांधकामांना परवानगी दिली जात होती. परंतु नुकतेच २ डिसेंबर २०२० रोजी मा.महाराष्ट्र शासन यांनी नविन **UNIFIED DCPR** लागु केले असल्याने भविष्यात ७० मिटर पेक्षा उंच इमारतींना बांधकाम परवानगी द्यावी लागणार असल्याने आगी

पासुन व बचावाच्या संरक्षणासाठी विदेशी बनावटीची टर्न टेबल लॅडर/ए.एल.पी. वाहन ९० मीटर उंचीचे आग/अपघात प्रसंगी परिस्थितीवर मात करण्यासाठी खरेदी करणे आवश्यक आहे.

**कर्मचारी कल्याण विभाग :**

नाशिक मनपातील स्थायी अस्थापनेवरील कायम सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनातून दरमहा कामगार कल्याण निधीची वर्गणी कपात करण्यात येते. त्याच प्रमाणे दरमहा जेवढी वर्गणी जमा होते तेवढीच रक्कम मनपाचा हिस्सा म्हणून सदरच्या वर्गणीत जमा केला जातो. महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व त्यांचेवर अवलंबुन असलेले कुटुंबातील सदस्य यांना दिर्घ आजारावर उपचारासाठी कामगार कल्याण निधीतून आर्थिक मदत दिली जाते.

**स्वेच्छा निधी व प्रभाग विकास निधी :**

मागील काही वर्षामध्ये 'स्वेच्छा निधी - 2%' या लेखाशिर्षाखाली खर्च झालेला नाही. तथापि यावर्षी स्वेच्छा निधीतून सन्माननीय सदस्यांनी सूचविलेली कामे हाती घेणेचे नियोजन करणेत येत आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या स्वतःच्या उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित शिल्लकेनूसार 2% स्वेच्छा निधी राखीव ठेवणेत आलेला आहे. सन २०२३-२०२४ करीता "स्वेच्छा निधी 2%" या लेखाशिर्षाखाली रु. १०.०१ कोटी (प्रति नगरसेवक रु. ०७ लक्ष) इतकी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रभाग विकास निधी अंतर्गत रु.४२.९० कोटी (प्रति नगरसेवक रु. ३०.०० लक्ष) तरतूद करणेत आली आहे. सदर तरतुदीतून प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील रु. ५.०० लक्ष मर्यादेतील अत्यावश्यक व स्थानिक स्वरुपाची कामे हाती घेणेत येतील. सदर कामांना प्रभाग समिती स्तरावर प्रशासकीय मान्यता देणेत येईल.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी रु. ५१.२६ कोटी आरंभीच्या शिल्लकेसह, र.रु. २४७७.०७ कोटी जमेचे व रु. २४७५.८६ कोटी खर्चाचे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन २०२३-२०२४ च्या मूळ अंदाजपत्रकानूसार, अखेरची शिल्लक रक्कम रु. १.२१ कोटी दर्शविण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे सन २०२२-२०२३ सुधारीत व सन २०२३-२०२४ चे मूळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

धन्यवाद... !

दिनांक: ०३/०३/२०२३

(डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, भा.प्र.से)
प्रशासक तथा आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक


# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## मा. आयुक्त, मा. स्थायी समिती व मा. महासभा यांनी संमत केलेले जमेचे अंदाज

### (सन १९९३-९४ ते २००५-२००६)

(रूपये कोटी)

| वर्ष | मा.आयुक्त | मा.स्थायी समिती | मा.महासभा |
|---|---|---|---|
| १९९३-९४ | ९०.२१ | ९२.८० | ९४.३६ |
| १९९४-९५ | १०३.४३ | ११२.१९ | ११४.३० |
| १९९५-९६ | १२६.११ | १४७.१६ | १५६.०१ |
| १९९६-९७ | १६६.४५ | १९७.१६ | २२०.५१ |
| १९९७-९८ | २००.४९ | २५७.१९ | २८९.९३ |
| १९९८-९९ | ३०३.७६ | ३६३.७६ | ४२३.५९ |
| १९९९-०० | २३८.३५ | २७८.४२ | ३४३.२६ |
| २०००-०१ | २३६.६८ | ३१५.६३ | ३१०.८८ |
| २००१-०२ | ३७५.७४ | ४३६.५८ | ४४४.५८ |
| २००२-०३ | ३८६.५७ | ५६३.०० | ५८३.०० |
| २००३-०४ | ४१०.२६ | ५६४.९८ | ५९६.९८ |
| २००४-०५ | ४१७.२१ | ४१७.२१ | ४६०.२१ |
| २००५-०६ | ४४७.३७ | ४९८.३७ | ६०७.९५ |




# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## मा. आयुक्त, मा. स्थायी समिती व मा. महासभा यांनी संमत केलेले जमेचे अंदाज

## (सन २००६-०७ ते २०२३-२४)

(रूपये कोटी)

| वर्ष | मा.आयुक्त | मा.स्थायी समिती | मा.महासभा |
|---|---|---|---|
| २००६-०७ | ४९८.४३ | ५४८.४३ | ७२०.३९ |
| २००७-०८ | ६५६.९४ | ७५१.९४ | ८७०.९४ |
| २००८-०९ | ६७७.८८ | ८५८.८६ | १०२७.८८ |
| २००९-१० | ७०७.०० | ८८२.५० | ११०२.५० |
| २०१०-११ | ७८३.६९ | ९२६.९४ | ११८२.८६ |
| २०११-१२ | १०३०.८५ | १०३०.८५ | १२४४.६४ |
| २०१२-१३ | ११७०.८५ | १८१०.८२ | २०३०.८२ |
| २०१३-१४ | १५५६.८० | २३५९.९५ | २७५५.९० |
| २०१४-१५ | १८७५.६९ | २९६५.६९ | ३०४३.६९ |
| २०१५-१६ | १४३७.६७ | १७६९.९७ | २१७९.९७ |
| २०१६-१७ | १३५७.९६ | १७३७.९६ | १७६१.५२ |
| २०१७-१८ | १४१०.०७ | १७९९.३० | २१७६.४१ |
| २०१८-१९ | १७८५.१५ | १९००.१५ | २०३३.४३ |
| २०१९-२० | १८९४.५० | १९८३.५० | २३३५.८७ |
| २०२०-२१ | २१६१.७९ | २३९०.३४ | २९४२.१८ |
| २०२१-२२ | २३६१.५६ | २७६३.८१ | २८८८.८१ |
| २०२२-२३ | २२२७.०५ | २५६७.०२ | २२२७.०५ |
| २०२३-२४ | २४७७.०७ | | |




# नाशिक महानगरपालिका, नाशिक

सर्वे भवन्तु सुखिनः

## जमा व खर्चाचा आलेख

### (सन १९८२-८३ ते १९९६-१९९७)

(रूपये कोटी)





| वर्ष | सन ८२-८३ | सन ८३-८४ | सन ८४-८५ | सन ८५-८६ | सन ८६-८७ | सन ८७-८८ | सन ८८-८९ | सन ८९-९० | सन ९०-९१ | सन ९१-९२ | सन ९२-९३ | सन ९३-९४ | सन ९४-९५ | सन ९५-९६ | सन ९६-९७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जमा (प्रारंभिक शिलकेसह) | ११.९४ | १५.८८ | २२.४५ | २४.३४ | २६.४३ | ३६.१५ | ४६.४८ | ५०.८० | ६६.८५ | ८५.६८ | ८९.३९ | ९४.३८ | ११०.८२ | १३८.२९ | १५२.४६ |
| खर्च | १०.२२ | १२.३२ | २०.१९ | २२.०१ | २३.०५ | ३०.२१ | ३८.०९ | ३९.४६ | ५१.८४ | ७०.६४ | ७२.९३ | ७३.३६ | ९३.७८ | १२१.७९ | १४८.१८ |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जमा व खर्चाचा आलेख

### (सन १९९७-९८ ते २०२३-२४)

(रूपये कोटी)




| तपशील | सन ९७-९८ | सन ९८-९९ | सन ९९-०० | सन ००-०१ | सन ०१-०२ | सन ०२-०३ | सन ०३-०४ | सन ०४-०५ | सन ०५-०६ | सन ०६-०७ | सन ०७-०८ | सन ०८-०९ | सन ०९-१० | सन १०-११ | सन ११-१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जमा (प्रारंभिक शिलकेसह) | १८२.८७ | २००.९० | २३३.५२ | २८७.६७ | ३६९.८३ | ३६८.३१ | ३४४.४९ | ३४७.१३ | ४१२.६७ | ५०७.८५ | ५८४.६४ | ६०२.७२ | ६३८.३४ | ७१५.७५ | ८३५.९६ |
| खर्च | १५७.३४ | १९५.२४ | २३०.३३ | २७६.७६ | ३५३.६५ | ३५९.९७ | ३३५.५६ | ३२१.८८ | ३५५.९३ | ४५६.९९ | ५४१.५५ | ५१९.६४ | ५८८.१२ | ६६५.६६ | ७८८.२९ |


| तपशील | सन १२-१३ | सन १३-१४ | सन १४-१५ | सन १५-१६ | सन १६-१७ | सन १७-१८ | सन १८-१९ | सन १९-२० | सन २०-२१ | सन २१-२२ | सन २०२२-२३ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२२-२३ आयुक्तांचे सुधारित अंदाज | सन २०२३-२४ मा.आयुक्तांचे अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जमा (प्रारंभिक शिलकेसह) | १००४.२० | ९१४.५७ | ९६७.०४ | ११३२.८४ | १२२५.५३ | १४४२.०५ | १६४५.९५ | २०७८.१४ | २२६५.१४ | २४२९.०१ | २२२७.०५ | २३७७.१२ | २४७७.०७ |
| खर्च | ९६८.५६ | ८५९.०५ | ८९७.८५ | ९८७.६८ | १०८०.८६ | ११४३.९३ | ११६०.७४ | १३३८.२७ | १७२५.५१ | २१३४.४८ | २२१९.०२ | २३२५.८६ | २४७५.८६ |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महसुली खर्च

### (सन २००९-१० ते २०२३-२४)

(रूपये कोटी)





| तपशिल | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ | २०१८-२०१९ | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | सन २०२२-२३ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२२-२३ आयुक्तांचे सुधारित अंदाज | सन २०२३-२४ मा.आयुक्तांचे अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महसुली खर्च | ३०३.९५ | ४५३.९० | ४२८.२६ | ४९०.६२ | ४९६.८७ | ५५९.९३ | ५६३.८२ | ६३७.१८ | ६७१.७९ | ८००.५२ | ९०१.५३ | ८६४.६१ | ९६५.७६ | ११६०.०९ | १४०२.५६ | १६८७.५५ |
| प्रतिशत हिस्सा | ५१.६८% | ६८.१९% | ५४.३३% | ५०.६५% | ५७.४८% | ६२.३६% | ५७.०९% | ५८.९५% | ५८.७३% | ६८.९७% | ६७.३७% | ५०.११% | ४५.२५% | ५२.२८% | ६०.३०% | ६८.१६% |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## भांडवली खर्च

### (सन २००९-१० ते २०२३-२४)

(रूपये कोटी)





| तपशिल | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ | २०१८-२०१९ | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | सन २०२२-२३ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२२-२३ आयुक्तांचे सुधारित अंदाज | सन २०२३-२४ मा.आयुक्तांचे अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | २६६.६३ | १९४.३० | ३१८.७४ | ४०७.५७ | ३१६.२४ | ३०१.४५ | ३८४.९६ | ३९८.५७ | ४३०.८४ | ३१८.५९ | ४०३.१९ | ७७७.४९ | १०८६.३३ | ९५८.१२ | ८०१.८५ | ७०१.१३ |
| प्रतिशत हिस्सा | ४५.३४% | २९.१९% | ४०.४३% | ४२.०८% | ३६.८१% | ३३.५७% | ३८.९८% | ३६.८८% | ३७.६६% | २७.४५% | ३०.१३% | ४५.०६% | ५०.८९% | ४३.१८% | ३४.४८% | २८.३२% |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## भांडवली खर्चाचा अंदाज

### (सन २०२३-२४)

| | | (रुपये कोटी) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | बांधकाम/विद्युत/उद्यान/ इतर भांडवली कामे | २९९.२२ | ४२.६८% |
| २ | नगर नियोजन | १००.०० | १४.२६% |
| ३ | शासन योजना-मनपा हिस्सा | ५०.३३ | ७.१८% |
| ४ | राखीव बाबी (''अ'' व ''प'' भांडवली खर्च) | ९०.१८ | १२.८६% |
| ५ | नगरसेवक स्वेच्छा निधी/ प्रभाग विकास निधी | ५२.९१ | ७.५५% |
| ६ | ''क'' भांडवली खर्च (पाणी पुरवठा/मलनि:सारण/ जलनि:सारण) | १०३.४२ | १४.७५% |
| ७ | ''प'' भांडवली खर्च | ५.०७ | ०.७२% |
| | एकूण भांडवली खर्च | ७०१.१३ | १००.००% |




# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जमेचे अंदाज

### (सन २०२३-२४)

| | | (रुपये कोटी) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | वस्तू व सेवा कर (GST) /स्थानिक संस्था कर/जकात | १३४४.८९ | ५४.२९% |
| २ | मालमत्ता कर (घरपट्टी) | २००.९८ | ८.११% |
| ३ | नगर नियोजन | २०५.०० | ८.२८% |
| ४ | पाणी पट्टी | ७५.५२ | ३.०५% |
| ५ | मिळकत, आरोग्य, सार्वजनिक वाहतूक व अन्य विभाग इ. | ११३.४९ | ४.५८% |
| ६ | रोड डॅमेज चार्ज, ड्रेनेज/पाणी कनेक्शन फी इ. | १६५.६० | ६.६९% |
| ७ | अनुदाने | ८.५८ | ०.३५% |
| ८ | परिवहन सेवा उत्पन्न | ०.०१ | ०.००% |
| ९ | संकिर्ण | ३०.५८ | १.२३% |
| १० | अग्रीम/इतर उचल रक्कमा | २७६.१६ | ११.१५% |
| ११ | कर्ज | ५.०० | ०.२०% |
| १२ | सुरवातीची शिल्लक | ५१.२६ | २.०७% |
| | एकूण | २४७७.०७ | १००.००% |



# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## खर्चाचे अंदाज

### (सन २०२३-२४)

| | | (रुपये कोटी) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम व्यवस्थापन | ४०४.४६ | १६.३३% |
| २ | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी (पाणी पुरवठा व्यवस्थापन + मलनि:सारण व्यवस्थापन + यांत्रिकी व्यवस्थापन) | १६२.९१ | ६.५८% |
| ३ | विद्युत व यांत्रिकी व्यवस्थापन | ८३.१० | ३.३६% |
| ४ | सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन | ४०.३५ | १.६३% |
| ५ | घनकचरा व्यवस्थापन + घनकचरा व्यवस्थापन - यांत्रिकी + स्वच्छ भारत अभियान व्यवस्थापन | १३४.८६ | ५.४५% |
| ६ | उद्यान व्यवस्थापन | २६.३२ | १.०६% |
| ७ | समाजकल्याण व्यवस्थापन | १३१.९० | ५.३३% |
| ८ | शिक्षण व्यवस्थापन | १२.५१ | ०.५१% |
| ९ | सार्वजनिक वाहतूक व नियोजन + कार्यशाळा व्यवस्थापन | ७७.४० | ३.१३% |
| १० | नगर नियोजन व्यवस्थापन | ११८.०० | ४.७७% |
| ११ | मालमत्ता कर/स्थानिक संस्था कर | २.२० | ०.०९% |
| १२ | नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग विकास निधी | ५२.९१ | २.१४% |
| १३ | अन्य विभाग | १८३.६१ | ७.४१% |
| १४ | आस्थापना/कार्यालयीन खर्च | ९५८.१४ | ३८.६९% |
| १५ | अग्रीम | ८७.१९ | ३.५२% |
| | एकूण | २४७५.८६ | १००.००% |

